।।श्री राम समर्थ।।
।।श्री नागनाथ प्रसन्न।।
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०६ वा | शनिवार, दि. २१ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


## अखेर रुपाली चाकणकरांचा महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा !

### सुनेत्रा पवारांकडं सोपवला राजीनामा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडं सोपवला आहे.

स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याचं महिला अत्याचार प्रकरण त्यांना भोवलं आहे.

रुपाली चाकणकर यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडं आपला राजीनामा सोपवण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीमध्येच मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीमध्ये चाकणकरांनी त्यांना आयोगाच्यावतीनं अशोक खरात प्रकरणात विशेष तपास पथकाद्वारे योग्य प्रकारे तपास करण्याची विनंती केली होती. तत्पूर्वी त्यांनी राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची देखील भेट घेऊन त्यांनाही महिला आयोगाच्यावतीनं या प्रकरणात सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याची विनंती केली होती.

दरम्यान, रुपाली चाकणकर यांचे अशोक खरातसोबतचे विविध कार्यक्रमांतील फोटो समोर आले होते. अशोक खरात याचा पाद्यपुजन सोहळा हा चाकणकरांच्या हस्ते पार पडला होता. त्याचबरोबर एका जाहीर कार्यक्रमात चाकणकरांनी खरातचं कौतुक करताना त्याला थेट विठ्ठलाचाही दर्जा देऊ केला होता. सातत्यानं या भोंदू बाबाच्या संपर्कात चाकणकर असल्याचं सिद्ध झाल्यानं चाकणकर या सातत्यानं टीकेच्या धनी झाल्या होत्या. तसंच त्यांच्यावर विरोधकांसह भाजपच्या नेते मंडळींकडून देखील टीका होऊ लागली होती. तसंच त्यांच्याकडून राजीनाम्यासाठी दबाव वाढत होता.



#### काय आहे प्रकरण ?

दरम्यान, शेकडो महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक झालेला स्वयंघोषित ज्योतिषी आणि आध्यात्मिक गुरु जो स्वतःला कॅप्टनं म्हणून संबोधायचा त्या अशोक खरातला पोलिसांनी बेड्या घातल्या आहेत. त्याच्याजवळून पोलिसांना तब्बल ५८ हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ जप्त केले आहेत. या अशोक खरातच्या विविध कार्यक्रमात रुपाली चाकणकरांनी उपस्थिती लावल्याचं तसंच खरातच्या धार्मिक संस्थेवर चाकणकर या विश्वस्त म्हणून काम करत असल्यानं त्या टार्गेटवर आल्या होत्या.

## ५६ कोटींच्या 'चेसी क्रॅक' घोटाळ्यावरून शिवसेनेचा एल्गार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेतील २०१४ मधील बस खरेदी प्रकरणातील कथित 'चेसी क्रॅक' घोटाळ्याविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने तीव्र आंदोलन छेडले आहे. या प्रकरणात तब्बल ५६ कोटी रुपयांची भरपाई महापालिकेच्या तिजोरीतून - म्हणजेच सोलापूरकरांच्या खिशातून वसूल केली जात असल्याचा आरोप करत शिवसेनेने संताप व्यक्त केला.

याच्या निषेधार्थ २० एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना शहरप्रमुख महेश धाराशिवकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

#### १४४ बस खरेदी; ९९ बसमध्ये 'चेसी क्रॅक'

२०१४ मध्ये सोलापूर महानगरपालिकेने अशोक लेलँड कंपनीकडून १४४ बसेस खरेदी केल्या होत्या. मात्र या बसेसमधील ९९ बसेसच्या चेसीमध्ये क्रॅक आढळल्याचा प्रकार उघडकीस आला. आरटीओचे फिटनेस प्रमाणपत्र असतानाही या बसेस निकृष्ट दर्जाच्या निघाल्या. हा केवळ तांत्रिक दोष नसून अधिकारी आणि कंपनीमधील संशयास्पद करारामुळे झालेला सुनियोजित घोटाळा असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

या प्रकरणी झालेल्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर आता ५६ कोटी रुपयांची भरपाई महापालिकेकडून करावी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा आर्थिक भार अखेर सामान्य नागरिकांवर पडत असल्याचा मुद्दा शिवसेनेने उपस्थित केला आहे.

#### दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी

या महाघोटाळ्याचा निषेध करत दोषींवर फौजदारी कारवाई करावी, तसेच ५६ कोटींची वसुली संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींकडूनच करावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे.

या आंदोलनावेळी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, विधानसभा संघटक सुरेश जगताप, विधानसभा प्रमुख बाळासाहेब गायकवाड, लोकसभा समन्वयक शरणराज केंगणाळकर, महानगर प्रमुख दत्ता माने, शहर उपप्रमुख बंटी बेळमकर, दिनेश चव्हाण, उज्वल दीक्षित, अमित भोसले, राम वाकसे, राजू कुसेकर, योगेश सलगर, जर्गीस मुल्ला, दत्ता खलाटे, अजय खांडेकर, महेश गवळी, अनिल बिराजदार, दिगंबर पालनकर, नागराज कंदकुर, राहुल परदेशी, विशाल सोरेगावकर यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूरकरांच्या हक्काच्या पैशांची लूट होऊ देणार नाही, असा इशारा देत शिवसेनेने या प्रकरणात आरपारची लढाई छेडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

#### सोलापूरकरांवर अन्यायाचा आरोप



#### 'दुसऱ्याच्या चुकीची शिक्षा सोलापूरकरांना का ?'

यावेळी बोलताना शहरप्रमुख महेश धाराशिवकर म्हणाले,'या घोटाळ्याला तत्कालीन आयुक्त आणि संबंधित परिवहन अधिकारी जबाबदार असताना त्याची शिक्षा सोलापूरकरांनी का भोगावी ? भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या चुकीचा दंड नागरिकांवर लादला जाणार असेल तर शिवसेना ते सहन करणार नाही.'

ते पुढे म्हणाले,'ज्यांनी निकृष्ट बसेस स्वीकारल्या, ज्यांच्या सह्या आहेत, त्यांच्या मालमत्तेतूनच ही रक्कम वसूल झाली पाहिजे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या भ्रष्टाचाराचे बिल आज सोलापूरकरांनी का भरावे ? दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत शिवसेना शांत बसणार नाही.'

## सोलापूरात पुढील वर्षापासून बोर्डाचे पेपर ठेवणार पोलीस कोठडीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पुढील वर्षापासून पुणे बोर्डाच्या दहावी व बारावीच्या प्रश्नपत्रिका संबंधित पोलिस ठाण्याच्या पोलीस कोठडीत ठेवण्यात येणार आहे. सांगोला येथील पेपर चोरी प्रकरणानंतर आता जिल्हा शिक्षण विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांचा बुधवारी दि. 18 मार्च रोजी शेवटचा भूगोल विषयाचा पेपर असताना मंगळवारी पहाटेच्या सुमारास सांगोला येथील विद्या मंदिर प्रशालेच्या बोर्ड कस्टडीतून ५० प्रश्नपत्रिकांची चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला होता.



याबाबत सांगोल्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले (वय ३४) यांनी सांगोला पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात फिर्याद दिली होती. १६ मार्चला दुपारी साडेचार ते १७ मार्च रोजी सकाळी साडेआठ यावेळेत ही घटना घडली होती. सांगोला विद्यामंदिर येथील बोर्ड कस्टडी रूममध्ये ठेवलेल्या पेटी क्रमांक ५४४९ मधील भूगोल विषयाच्या २५-२५ प्रश्नपत्रिकांची पाकिटे अज्ञात व्यक्तीने कुलूप तोडून चोरून नेल्या होत्या. याप्रकरणी १७ मार्च रोजी सांगोला पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने तपास करून पेपर चोरी करणाऱ्याला साहित्यासह पकडले. अभ्यास न केल्याने दहावीतीलच एका अल्पवयीन मुलाने हे कृत्य केल्याचे उघड झाले. पेपर चोरीच्या प्रकरणानंतर पुणे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.

#### आता मराठवाडा पॅटर्न...

सोलापूर जिल्ह्यात दहावी व बारावीच्या परीक्षेच्यावेळी पुणे बोर्डकडून आलेले पेपर तालुक्याच्या कस्टडीत ठेवले जात होते. मराठवाड्यात मात्र यापेक्षा जास्त काळजी घेतली जात आहे. मराठवाड्यात संबंधित परीक्षा केंद्राच्या पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस कोठडीमध्ये हे पेपर ठेवले जातात. पेपरच्या दिवशी दोन तास आधी संबंधित केंद्रप्रमुख पोलीस ठाण्यात जाऊन पत्र दिल्यानंतर डायरीत नोंद करूनच प्रश्नपत्रिका ताब्यात दिल्या जातात. सोलापूर जिल्ह्यातील पद्धत धोकादायक ठरल्याने आता मराठवाडा पॅटर्न अवलंबण्यात येणार आहे.

> सांगोल्यातील प्रकरणाबाबत माध्यमिक शिक्षण विभाग पुणे बोर्डाला अहवाल सादर करणार आहे. आता पुढील वर्षापासून प्रश्न पत्रिकांबाबत ज्यादा खबरदारी घेण्यात येणार आहे. मराठवाड्याप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातह बोर्डाकडून आलेल्या प्रश्नपत्रिका पोलीस ठाण्याच्या कस्टडीत ठेवण्याचा प्रस्ताव दिला जाणार आहे.
>
> **- सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

## महापालिका कामकाजाच्या पहिल्याच सभेत महापौरांनी ५२ विषय केले मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या महापालिका कामकाजाच्या पहिल्याच सभेत महापौर विनायक कोंड्याल यांनी तब्बल ५२ विषयांना मंजुरी दिली. अनेक मुद्द्यांवर विरोधकांना नामोहरम करत सर्वांशी समन्वय साधून महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या प्रशासकीय कामकाजाची चुणूक दाखविली. दरम्यान, विरोधकांनी अनेक प्रस्ताव घाईगडबडीत दाखल केल्याने विषय चर्चेला आल्यानंतर त्यांची चांगलीच गोची झाल्याचे पाहायला मिळाले.

शुक्रवारी झालेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत विरोधकांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कर सवलत योजनेचा प्रस्ताव आणला होता. हा विषय चर्चेला येताच परंतु सत्ताधारी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी यांनी ही योजना भाजपा सत्तेत असताना २०१९ पासूनच लागू असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच या योजनेचा लाभ वीरपत्नी, स्वातंत्र्य सैनिक अशा घटकातील ७५० कुटुंबे घेत असल्याचेही सांगितले. विरोधकांमध्ये ज्येष्ठ नगरसेवक असूनही विरोधकांनी अपुऱ्या माहितीच्या आधारावर प्रस्ताव आणल्यामुळे सभेत विरोधकांची पुरती फजिती झाली.



#### ......अन्यथा सभागृहाच्या बाहेर काढण्याची तंबी

मागील सर्वसाधारण सभेचा अनुभव पाहता काही नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत प्रचंड गोंधळ केल्याचे दिसून आले होते. ही शक्यता जाणून घेऊन महापौर विनायक कोंड्याल यांनी सभेच्या प्रारंभीच सर्व सदस्यांनी सभागृहाची शिस्त पाळावी अन्यथा सभागृहात विनाकारण गोंधळ माजवणाऱ्या सदस्यांना सभागृहाच्या बाहेर काढण्यात येईल अशी तंबी दिली. त्यामुळे सभागृहाच्या कामकाजाला तुलनेने अधिक शिस्त लागल्याचे चित्र होते.

कर थकबाकीदारांनी ३१ मार्चपूर्वी कर भरल्यास त्यांना सोलापूर महानगरपालिकेकडून शास्ती फी मध्ये ५० टक्के सवलत जाहीर करण्यात आली होती. परंतु अधिकाधिक कर वसुली व्हावी आणि महापालिकेत चे उत्पन्न वाढावे याकरिता सत्ताधारी भाजप सदस्यांनी ही शास्ती फी १०० टक्के माफ करावी असा प्रस्ताव सभेत सादर केला. यावर महापौर विनायक कोंड्याल यांनी सकारात्मक निर्णय घेत १०० टक्के शास्ती फी माफी देण्याचा निर्णय घेतला. यातून कर वसुली मोठ्या प्रमाणात होणार असून महापालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

लिंगायत स्मशानभूमीला जागा देण्याच्या विषयातही महापौर श्री. कोंड्याल यांनी योग्य समन्वय साधत श्री सिद्धेश्वर (पान 2 वर..)

## सोलापूर जिल्हा परिषद गटांना मिळणार २१ कोटींचा विकासनिधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपच्या विजयी झालेल्या ३८ जिल्हा परिषद सदस्यांना त्यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी २१ कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन पूर्ण करण्यात येणार आहे. पुढील चार वर्षांत प्रत्येक सदस्याच्या मतदारसंघात विकासकामांसाठी हा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असा शब्द ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राजन पाटील, प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत, राम सातपुते, दीपक साळुंखे-पाटील, शहाजी पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, मनपा गटनेते नरेंद्र काळे (पान 2 वर..)



#### 'सुफडा साफ'वर टोला

निवडणुकीपूर्वी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भाजपचा सुफडा साफ करू, असे वक्तव्य केले होते. यास प्रत्युत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले, नगरपालिकांमध्ये सर्वाधिक १४४ नगरसेवक, महापालिकेत ८७ नगरसेवक, ११ पैकी १० पंचायत समित्यांमध्ये भाजपचे सभापती व उपसभापती, तसेच आता जिल्हा परिषदेत स्वबळावर अध्यक्ष-उपाध्यक्ष झाले आहेत. त्यामुळे कोणाचा सुफडा साफ झाला, हे त्यांनीच ठरवावे, असा टोला त्यांनी लगावला.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949


आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्‌भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007







## संपादकीय

# आता गरज मध्यस्थीची

इराण विरुद्धचे युद्ध सुरू होऊन आता 18 दिवस होऊन गेले आहेत. अजूनही हे युद्ध संपण्याची कुठलीही शक्यता नजरेच्या टप्प्यात आलेली दिसत नाही. या युद्धाशी ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नाही असे अनेक देश या युद्धामुळे नाहक अडचणीत आल्याचे सध्याचे चित्र आहे. भारतासह जगातल्या अन्य देशांमध्ये गॅस आणि इंधन टंचाई भेडसावू लागली आहे.

आखातातील ज्या देशांमध्ये अमेरिकेचे तळ आहेत त्या तळावर इराणने क्षेपणास्त्र हल्ले करून त्या देशांचेही मोठे नुकसान केले आहे.

वास्तविक या आखाती देशांचाही इराण अमेरिका युद्धाशी काहीही संबंध नव्हता. या युद्धामुळे जगातली पुरवठासाखळी विस्कळीत होऊ लागली आहे, विमान वाहतूक, जहाज वाहतूक खंडित झाली आहे. हे युद्ध आता कधी संपणार याकडे सगळे जग डोळे लावून बसलेले आहे, पण अमेरिका किंवा इस्रायल अजूनही माघारीला तयार नाहीत किंवा इराणही अजून हार मानायला तयार नाही.

या सगळ्या पार्श्वभूमीवर या संघर्षावर तोडगा काय, असा प्रश्न आता जागतिक व्यासपीठावर उपस्थित होऊ लागला आहे. युद्धामुळे झालेले दुष्परिणाम सगळीकडेच चर्चेला आले त्यामुळे सगळीकडची वस्तुस्थिती जगातल्या सगळ्यांना समजली; पण युद्ध समाप्तीचा तोडगा काय यावर मात्र अजून कोणीही ठामपणे काहीही सांगताना दिसत नाही, किंबहुना हे युद्ध काय केल्याने थांबू शकेल याचा अजूनही अंदाज येताना दिसत नाही.

इराणने शरणांगती पत्करावी अशी अमेरिका आणि इस्रायलची इच्छा आहे, पण इराण इतके प्रचंड नुकसान सोसूनही शरणागती पत्करायला तयार नाही आणि त्यामुळे त्यांच्याविरुद्धच्या कारवाया थांबवायला अमेरिका आणि इस्रायल राजी नाही अशी आजची स्थिती आहे. त्यामुळे या संघर्षावर आता प्रभावी मध्यस्थीची गरज निर्माण झाली आहे. तथापि ही मध्यस्थी कोण करणार हा प्रश्नही अनुत्तरितच राहिला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघासारख्या जागतिक संघटना अशा संघर्षाच्या विषयावर प्रभावी मध्यस्थी करू शकतात, पण आमच्या संघटनेची आता तेवढी ताकद राहिलेली नाही असे स्पष्ट वक्तव्य संयुक्त राष्ट्र संघाच्या सरचिटणीसांनीच केले आहे. जिथे संयुक्त राष्ट्र संघटनेनेच हात टेकले तेथे बाकी जगातल्या छोट्या मोठ्या संघटनांचे काय चालणार? जी20, जी8, नाटो, ब्रिक्स, आसियान, ओपेक अशा वेगवेगळ्या संघटना जगात कार्यरत आहेत; पण या सगळ्या संघटना सध्या या केवळ मूकदर्शक बनून राहिल्या आहेत. त्याचे एक मुख्य कारण असे की या सगळ्या संघटनांवर अमेरिकेचे एकतर्फी वर्चस्व आहे, त्यामुळे अमेरिकेला शहाणपणा शिकवण्याचे धाडस यापैकी कुठल्याही संघटनेत नाही.

आंतरराष्ट्रीय न्यायालय यात काही भूमिका बजावू शकते का? याची चाचपणी करण्याचे प्रयत्न काही जागतिक तज्ज्ञांनी व्यक्त केली होती, पण त्यातूनही ठोस उत्तर मिळत नाही. आता खरं म्हणजे मुख्य मुद्दा असा आहे की जे देश प्रत्यक्ष या युद्धात उतरले आहेत त्यांनासुद्धा हे युद्ध नकोसे झाले आहे. त्यांनाही हे युद्ध जितक्या लवकर थांबेल ते हवे आहे, पण फक्त पहिल्यांदा माघार कोण घेणार या कळीच्या मुद्द्यावर हा संघर्ष येऊन ठेपला आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी माघार घेणे अपेक्षित आहे पण त्यातून त्यांच्या इभ्रतीला धक्का पोहोचणार असल्याने माघारीच्या हालचाली त्यांच्याकडून होणार नाहीत.

इतके प्रचंड नुकसान सोसल्यानंतर आणि आपल्या देशाच्या सर्वोच्च नेत्याचे या युद्धात बलिदान पडल्यानंतरही इराणची खुमखुमी अजून संपलेली नाही. त्यांनाही हे युद्ध तातडीने बंद झाले तर हवेच आहे, पण इस्रायल पुढे माघार कशी घ्यायची हा त्यांच्या पुढचा प्रश्न आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन, खरं म्हणजे भारतासारख्या एका जबाबदार देशाला मध्यस्थीची चांगली भूमिका बजावण्याची संधी आहे.

पण ही संधी साधण्याच्या हालचाली भारतीय नेतृत्वाकडून होताना दिसत नाहीत, किंबहुना आपले कोण ऐकणार अशी साशंकता भारतीय नेतृत्वाच्या मनात निर्माण झालेली दिसते. मोदींच्या नेतृत्वाखालील भारत सध्या अमेरिका आणि इस्रायलच्या दबावाखाली आहे असे चित्र या आधीच निर्माण झाले आहे.

मोदींच्या पूर्वीचा भारत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जबाबदारीने भूमिका पार पाडताना दिसत होता आणि भारताच्या भूमिकेला जागतिक व्यासपीठावर तेवढा मानही मिळत होता; पण आता बदलत्या भूराजकीय स्थितीत भारत तसे करू शकत नाही.

हे युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील कोणी नेता यात पुढाकार घेताना का दिसत नाही हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हे युद्ध आम्ही कितीही दिवस चालू शकतो अशा वल्गना अमेरिकेने केलेल्या असल्या तरी युद्धाचे दुष्परिणाम आता अमेरिकेतही दिसू लागले आहेत, तेथेही इंधनाचे भाव वाढू लागले आहेत आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेला या युद्धामुळे मोठा फटका बसला आहे ही वस्तुस्थिती त्यांनाही मान्यच करावी लागत आहे.

त्यामुळे आता केवळ प्रतिष्ठेसाठी हा संहार तसाच पुढे चालू ठेवण्यापेक्षा संपूर्ण जगावर उपकार म्हणून स्वतः अमेरिकेनेच आता सबुरीची भूमिका घेत मोठ्या संकटातून जगाची मुक्तता करावी अशी अपेक्षा आहे. अशी जबाबदार भूमिका अमेरिकेच्या अध्यक्षांनीच पार पाडावी. पण डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखा माणूस इतकी जबाबदारीची भूमिका पार पाडेल काय हाच मुख्य प्रश्न आहे.

# आई वडील आहेत तोपर्यंत...

आजच्या काळात मार्मिक संदेश देणारा अतिशय सुंदर असा व्हिडिओ फेसबुकवर नुकताच पाहायला मिळाला. त्या सुंदर अशा व्हिडिओमध्ये सांगितले गेले आहे की मित्रांनो तुमचे आईवडील हयात आहेत तोपर्यंत यशस्वी होऊन दाखवा, कारण आपले यश पाहून त्यांना होणारा आनंद या जगात अन्य दुसऱ्या कोणाला होत नसतो. आई वडिलांचा आदर्श घेऊन, खूप कष्ट सोसून आणि अपार मेहनत घेऊन आपण यशस्वी झाल्यानंतर आईवडिलांच्या चेहऱ्यावर जो अवर्णनीय आनंद दिसतो तो आनंद इतरांच्या चेहऱ्यावर अजिबात दिसत नसतो. आईवडील हेच खरे आपले हितचिंतक असतात, आणि शुभचिंतक असतात. कोणत्याही आईवडिलांना भोळी भाबडी आशा असते की आपली लेकरं खूप खूप शिकावीत, मोठ्या पदावर जावीत. म्हणून ते रात्रंदिवस लेकरांसाठी राबतात, कष्ट सोसतात. अशा कष्टाळू आई वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवणे सर्व मुलामुलींचे कर्तव्य असते. म्हणून आईवडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून मन लावून शिक्षण शिका, ध्येय गाठण्यासाठी अपार मेहनत करा आणि यशस्वी होऊन दाखवा. जे आवडीचे क्षेत्र आहे त्या क्षेत्रात मोठ्या पदावर विराजमान व्हा. तुम्ही यशस्वी झाल्यानंतर तुमचे यश पाहून तुमच्या आई वडिलांना जो आनंद होईल त्या आनंदाचे अचूक वर्णन कोणालाही करता येणार नाही असा आनंद त्यांना होतो.

जेव्हा रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता तेव्हा राजमाता माँसाहेब जिजाऊंना जो आनंद झाला होता तो आनंद आजवर कोणत्याही लेखकाला व कवीला अचूक शब्दांत लिहिता आला नाही. आणि यापुढे लिहिता येणार नाही. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा बॅरिस्टर होऊन भारतात आले तेव्हा माता रमाई आंबेडकर यांना जो आनंद झाला होता तो आनंद शब्दातीत होता. त्यावेळी बाबासाहेबांचे आईवडील माता भिमाई व रामजी सुभेदार हयात नव्हते. परंतु, त्यांच्यानंतर रमाई ह्याच बाबासाहेबांचे आईवडील होत्या हा इतिहास कधीच विसरता येणार नाही. कारण रमाईला जो त्यागमय जीवन संघर्ष करावा लागला तो जीवन संघर्ष अजरामर झाला आहे. थॉमस एडीसन आणि जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर या दोन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांना त्यांच्या लहानपणी मंदबुद्धी बालक म्हणून त्यांच्या शाळांनी प्रवेश नाकारला होता तेव्हा दोघांच्या आईची जी घालमेल झाली होती ती अतिशय करूणाजनक होती. पण त्यांनी स्वतःला सावरले, आणि आपल्या मुलांना असे काही ज्ञानामृत पाजले ते अन्य कोणत्याही शाळेत मिळणारे नव्हते. पण खेदाची बाब अशी की या दोन्ही शास्त्रज्ञांचे यश पाहायला त्यांच्या आई हयात नव्हत्या.

आजकाल बहुतांश मुले मुली कुसंगतीमुळे वाईट मार्गाला लागली आहेत. मोबाईलचा नाद आणि सटरफटर जीवन जगण्याची उर्मी यांच्या कचाट्यात अडकल्याने शिक्षण आणि अभ्यासाचा अगदी कचरा केला जात आहे. जीवनात एखादे उच्च ध्येय ठरवून त्याला प्राप्त करण्यासाठी जीवाचा आटापिटा करणे आणि अपार कष्ट सोसणे आता भूतकाळात जमा झाले आहे. आईवडिलांनी घाम गाळून कष्टाची कामे करायची आणि त्यांच्या तरूण मुलांनी व्यसनांत गुरफटून जायचे हेच सध्या जिकडे तिकडे सुरू आहे. आईवडिलांचे वय झाले तरीही त्यांना मेहनतीची कामे करावी लागतात याचे आजच्या निष्क्रिय तरूणांना काहीच वाटेना झाले आहे. शिक्षण अपूर्ण ठेवणे, व्यसने करणे, ढाब्यावर जेवायला जाणे, मोबाईलवर विविध गेम्स खेळणे, रिकामटेकड्या मित्रांचे वाढदिवस साजरा करणे हेच आजच्या तरूणांचे ठळक वैशिष्ट्ये झाले आहेत. अशा वृत्तीमुळे तरुणांमध्ये नैराश्य येत आहे, जीवन आळणी व बेचव झाले आहे. अशा निर्व्यसनी व कामचुकार तरुणांच्या आईवडिलांच्या स्वप्नांचा चुराडा झाला आहे. अशा नैराश्यजनक काळातही फार थोडे तरूण तरूणी प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत उच्च शिक्षणाचे शिखर सर करत आहेत. आवडत्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी संबंधित शिक्षणाचा कोर्स पूर्ण करत आहेत. स्पर्धा परीक्षांची जय्यत तयारी करून त्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत आहेत. आणि आईवडिलांचे स्वप्न साकार करत आहेत. अगदी गरीब घरचे मुलेमुली एकाग्रतेने शिकून मोठे यश पदरात पाडून घेत आहेत. तेव्हा सारा गाव मोठ्या मनाने त्यांचे कौतुक करू लागला आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक समाजात आणि भावकीत काही जळक्या वृत्तीचे लोक असतात जे नेहमी नकारात्मक विचारांचे असतात. त्यांना इतरांच्या मुलांमुलींचे यश व कर्तृत्व पाहवत नाही.

अशा जळक्या वृत्तीच्या लोकांना गप्प करण्यासाठी, त्यांच्या मानसिकतेवर आघात करण्यासाठी आणि आपल्या आईवडिलांच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आनंद पेरण्यासाठी अगदी वेळेवर यशस्वी होणे गरजेचे असते. म्हणून मन लावून एकाग्रतेने उच्च शिक्षण शिकायचे, आवडीचा डिप्लोमा करायचा, स्पर्धा परीक्षा द्यायची असे जे जे गरजेचे आहे ते नक्की करा. रात्रंदिवस अभ्यास करा परंतु यशस्वी होऊन दाखवा. आपल्या आईवडिलांच्या चेहऱ्यावर आनंद पसरवा. त्यांना सुखाचे दिवस दाखवा. आई वडिलांचा तो आनंद हृदयाच्या एका कोपऱ्यात कायम स्वरूपात साठवून ठेवा. तो आनंद इतरत्र कोठेही पाहायला मिळत नाही!

**– बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता. अहमदपूर
जि. लातूर मो. ९७३०९३९७३२

# चिमण्यांसाठी एवढे कराच!

दरवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही हा दिवस जगभर उत्साहात साजरा केला गेला. चिमणी या चिमुकल्या पक्षासाठी व त्याचा संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाटयाने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वात जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात, बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यातून एकदा दोन चार अंडी घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यासारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाटयाने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल. पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्वाचे त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यासारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करुन चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मराठी भवनचे काम सुरू करण्यासाठी मंत्री शेलार यांना निवेदन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पार्क चौकातील शुभराय आर्ट गॅलरीच्या जागेवरील रखडलेल्या मराठी भवनचे बांधकाम तातडीने सुरू करावे अशी मागणी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.



यावेळी कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष अमोल धाबळे, सल्लागार अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर, भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सोलापूर हे महत्वाचे शहर आहे. मराठी साहित्य, नाट्य, संगीत आणि विविध कला समृध्द करण्यासाठी सोलापूर मधून अनेकांनी योगदान दिले आहे. अनेक प्रतिभावंत साहित्यिक, कलावंत या सोलापूरने महाराष्ट्राला दिले. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र या तीन राज्यांच्या सीमेवर असूनही मराठी भाषेची वृध्दी करण्यात सोलापूर हे अग्रेसर आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये मराठी भवन असावे त्यातील एका विभागाला स्वर्गिय दत्ता हलसगीकर यांचे नाव द्यावे अशी अपेक्षा महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने तत्कालीन आमदार आणि विद्यमान खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे व्यक्त करण्यात आली होती त्यानुसार स्व. डॉ. वासुदेव रायते, हास्यसम्राट प्रा. दिपक देशपांडे, प्रशांत बडवे, रवी हलसगीकर यांचे शिष्टमंडळ आ. प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना भेटून मराठी भवनच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. त्यावर सकारात्मकपणे प्रतिसाद देत तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर गेल्या 7 ते 8 वर्षापासून मराठी भवनच्या मागणीचा पाठपुरावा करून आ. प्रणिती शिंदे यांनी सोलापूरमध्ये मराठी भवन तयार करण्यासाठी राज्य शासनाकडून निधी मंजूर करून आणला. त्याबाबतचा आदेशही जिल्हा प्रशासलाना प्राप्त झाला. त्यानुसार बांधकामाला सुरूवात झाली परंतु गेल्या दोन वर्षापासून हे बांधकाम बंद अवस्थेत आहे. त्याचा पाठपुरावा म्हणून आणि मराठी भवन लवकरात लवकर सोलापूरकरांना उपलब्ध व्हावे या हेतुने राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे कार्यक्रमानिमित्त शहाजी पवार यांच्या घरी आले होते त्यावेळी त्यांना मराठी भवनचे बांधकाम तातडीने सुरू करावे यासाठी निवेदन देण्यात आले. त्यावर त्यांनी सोलापूरच्या मराठी भवनचे काम सुरू करण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष अमोल धाबळे, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर, सल्लागार अविनाश महागांवकर यांच्या हस्ते हे निवेदन नामदार आशिष शेलार यांना देण्यात आले यावेळी शहाजी पवार, इंद्रजित पवार आदि उपस्थित होते.

# सोलापूर झेडपी शिक्षण विभागाचा 'गुढीपाडवा पट वाढवा' अभियान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या 'गुढीपाडवा पटसंख्या वाढवा' या अभियानाचा शुभारंभ उत्तर सोलापूर तालुक्यातील अंबिका नगर जिल्हा परिषद शाळेत करण्यात आला.



या कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रप्रमुख जीवराज खोबरे यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा लक्ष्मी कनकधर या होत्या. यावेळी उपाध्यक्ष प्रज्ञा राऊत, मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे, शिक्षिका वैशाली गोंदकर, विद्या वरडुळे, रसिका बंदीछोडे, अंगणवाडी सेविका प्रभा जानराव उपस्थित होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे प्रवेश फार्म भरून त्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य गुलाब पुष्प व खाऊ देऊन औक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी खास तयार करण्यात आलेल्या सेल्फी पॉईंट वर सर्व नवागत विद्यार्थ्यांचे फोटो काढण्यात आले. विविध उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून 'गुढीपाडवा पट वाढवा'या अभियानाचे महत्त्व विशद केले. यासाठी पालक व विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन शिक्षक शिवशंकर राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार शिवाजी वडते यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विध्यार्थी, पालक व शाळेतील शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# घरकुल पूर्ण होण्यासाठी दक्षिण पंचायत समितीचे बांधकाम अभियान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व लाभार्थींचे घरकुल पूर्ण होण्यासाठी दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी गुढीपाडवा ते रामनवमी म्हणजेच 19 मार्च ते दि. 26 मार्च या कालावधीत घरकुल बांधकाम आवास सप्ताह आयोजित केला आहे.



या अभियानाबाबतचे परिपत्रक गटविकास अधिकारी राऊत यांनी तालुक्यातील सर्व सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांना वितरित केले आहे. केंद्र पुरस्कृत योजना ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत योजना ग्रामीण अंतर्गत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत घरकुल बांधकाम आवास सप्ताह आयोजित करण्याचे सूचित केले आहे. या आवास सप्ताहामध्ये घरकुल लाभार्थीर्चे मेळावे ग्रामपंचायत निहाय सरपंच यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करणेत यावेत. घरकुल लाभार्थी यांना घरकुल बांधकाम करणेसाठी येणाऱ्या अडचणीच्या अनुषंगाने लाभार्थीनिहाय नियोजन करणेत यावे. तसेच ज्या घरकुल लाभार्थींचे करारनामा बाकी असतील त्यांचे तात्काळ करारनामा करावेत. करार झालेल्या लाभार्थींचे पायाभरणी संबंधीचे बांधकाम साहित्य जमा करणेस सहकार्य करावे. तसेच ज्या घरकुल लाभार्थीर्चे बांधकाम सुरु होऊन लिंटेलपर्यंत काम पुर्ण झालेले आहे. अशी सर्व घरकुले अभियान कालावधीमध्ये म्हणजेच गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत तात्काळ पूर्ण करावीत. सदर अभियान कालावधीत सरपंच यांचे मार्गदर्शनाखाली अभियान यशस्वी होण्याकरिता संबंधित ग्रामपांचयतस्तर व पंचायत समिती घरकुल विभागस्तर यांनी सर्वतोपरी सहाय्य करून आपले योगदान देणार आहेत. पावसाळ्याआधी घरकुल पूर्ण व्हावी यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा ग्राम विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप व ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सतत पाठपुरावा सुरू ठेवला आहे. त्यामुळे अभियानाद्वारे गरिबांच्या घरकुलाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी दिली.

पान १ वरून

# सोलापूर जिल्हा परिषद...

यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

लोकांनी विश्वासाने विजयी केल्यामुळे आता जबाबदारी वाढली असल्याचे सांगत मंत्री गोरे म्हणाले की, पुढील पाच वर्षे जनतेशी सतत संपर्क ठेवून त्यांच्या समस्या सोडवण्यावर भर द्यावा. शेतकरी कुटुंबातील शेतमजूर किंवा शेतकरी जिल्हा परिषद अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपमध्येच शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सर्व सदस्यांनी आचार-विचार आणि वर्तन चांगले ठेवून जनतेशी सुसंवाद साधावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, जनतेने दाखवलेल्या विश्वासाला साजेस काम करण्याचा प्रयत्न राहील. जिल्हा परिषदेत भाजपचे ३८ सदस्य विजयी होत प्रथमच सत्ता मिळाली असून सत्तेचा उपयोग जनतेच्या विकासासाठीच केला जाईल.

माजी आमदार राजन पाटील यांनी जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले असून मागील काही वर्षांतील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याची अपेक्षा व्यक्त केली. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी पक्षाने बार्शी तालुक्यावर विश्वास दाखवत अध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करत हा विश्वास कायम ठेवण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रशांत परिचारक, नूतन अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

# महापालिका कामकाजाच्या पहिल्याच...

देवस्थानला अक्कलकोट रस्त्यावरील स्मशानभूमीसाठी तर होटगी मठाला जुळे सोलापूर परिसरात स्मशानभूमी तयार करण्यासाठी जागा देण्याचा निर्णय घेतला. या मुद्द्यावरही विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना घेण्याची तयारी सुरू असताना महापौर विनायक कोंड्याल यांनी समन्वयाची भूमिका घेतली. याबाबत सहा महिन्यांपासून प्रशासनाचा पत्रव्यवहार सुरू आहे प्रशासकीय काळात याबाबत ठराव देखील झालेला आहे. श्री सिद्धरामेश्वर देवस्थानला श्री रूपा भवानी मंदिर रस्त्यावरील रुद्रभूमीची व्यवस्था पाहण्याचा अनुभव असल्यामुळे आणि अक्कलकोट रस्त्यावरील रुद्रभूमीचे व्यवस्थापन करण्याची तयारी सर्वप्रथम देवस्थाने दाखवल्यामुळे अक्कलकोट रस्त्यावरील स्मशानभूमी श्री सिद्धरामेश्वर देवस्थानला तर जुळे सोलापुरातील स्मशानभूमी होटगी मठाला देण्याचा निर्णय करण्यात आला. यातही विरोधक 'बॅकफूटवर' गेल्याचे दिसले. समाज हिताच्या निर्णयात राजकारण करू नये अशी विनंतीही महापौर विनायक कोंड्याल यांनी सदस्यांना केली.

सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंती बांधण्यासाठीचा नियोजन आराखडा करण्यासही मंजुरी देत सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांनी गोरगरीब विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक धोरणाविषयीची आपली स्पष्ट भूमिका दाखवून दिली. याशिवाय नगरोत्थान योजनेतील २ कोटी ७१ लाख रुपयांच्या रस्त्यांच्या कामांना मंजुरी देऊन नागरिकांकडून आलेल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्राधान्य दिल्याचे दिसले.

विधानसभा सदस्यांप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेतील नगरसेवकांनाही प्रशासनाशी कामकाजाच्या सोयीसाठी ओळख व्हावी, योग्य समन्वय साधता यावा याकरिता बिल्ला देण्याचा प्रस्ताव नगरसेवक अक्षय अंजिखाने यांनी मांडला होता. महापौर विनायक कोंड्याल यांच्यासारख्या मोजक्या सदस्यांना जरी सोलापूर महानगरपालिकेतील १५ ते २० वर्षांच्या प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असला तरी विशेषतः नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांच्या सोयीसाठी महापौर विनायक कोंड्याल यांनी सर्व नगरसेवकांना बिल्ला देण्याचा निर्णय या सर्वसाधारण सभेत घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे नव्याने निवडून आल्यामुळे प्रशासनाशी ओळख नसलेल्या नगरसेवकांना आधार मिळाल्याची चर्चा सर्वसाधारण सभेनंतर नगरसेवकांमध्ये होती.

एकूणच, शुक्रवारी झालेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह सभागृह नेते नरेंद्र काळे, जेष्ठ नगरसेविका रोहिणी तडवळकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते तसेच भाजपाच्या अनुभवी नगरसेवकांनी सभेसमोर आलेल्या विविध विषयांमध्ये नागरिक, नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात समन्वयाची भूमिका घेऊन शहर विकासाच्या विषयांना प्राधान्यक्रम देत मंजूरी दिल्यामुळे 'सबका साथ सबका विकास' हे धोरण राबवल्याची चर्चा नगरसेवकांमध्ये आणि शहरवासीयांमध्ये शुक्रवारी होती.

## वात्रटिका

### नवी व(ख)रात

कुठे युद्धाच्या झळा
तर कुठे भोंदूगिरी...
बाबाची चांदीच चांदी
आणि नेते पायावरी...
डिझेल पेट्रोल भडकले
महागाई काही सोसवेना...
अंगलट येते आपलेच कृत्य
फरार झाले कोणी, तर
कोणी तोंड दाखवेना...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# तडवळा पॅटर्न जिल्हयात अव्वल; तब्बल चौदा विद्यार्थी नवोदय पात्र

**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** सन 2025-26 मध्ये दि.13 डिसेंबर 2025 झालेल्या नवोदय प्रवेश पात्र परीक्षेत जिल्हाभरातून 8375 विद्यार्थी बसले होते. दि. 17 मार्च 2026 रोजी लागलेल्या निकालातून एकूण 80 विद्यार्थ्यांची निवड तुळजापूर येथील नवोदय विद्यालयास झाली आहे. त्यात एकट्या कसबे तडवळे गावचे 14 विद्यार्थी प्रवेश पात्र झाले आहेत. यात जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा कसबे तडवळे शाळेतील अकरा तर जिल्हा परिषद आदर्श केंदीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे शाळेतील तीन असे एकूण चौदा विद्यार्थी प्रवेश पात्र झाले आहेत.जिल्ह्यात एकाच गावचे चौदा विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र होण्याचा मान प्रतिवर्षाप्रमाणे कसबे तडवळे या गावाला मिळाला आहे.कन्या शाळेतील नवोदयसाठी तब्बल 11 विद्यार्थीनी नवोदय प्रवेश परीक्षेत यशस्वी होऊन तुळजापूर येथील नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरल्या आहेत. यात मीनल सचिन वाघे ,धनश्री दादा एडके.श्रीनिधी विलास कांबळे,तक्षशिला बन्सी कसबे,आरोही अजित पाटील ,राधिका विशाल लंगडे,स्वराली किसन भिसे,संस्कृती सुदाम लोमटे,सायली संदीप खैरे,आरोही शिवाजी देशमाने ,आनंदी औदुंबर पंडित तर केंद्रीय प्राथमिक शाळेतील रुद्रकांत रजनीकांत बेद्रे,ऋषिकेश रामचंद्र मनके व सक्षम आप्पाराव शिंदे असे एकूण चौदा विद्यार्थी तुळजापूर येथील नवोदय विद्यालयासाठी प्रवेश पात्र झालेले आहेत.या यशासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेली उत्कृष्ट तयारी, पालकांचे सहकार्य व वर्षभर कोणताही खंड न पडू देता केलेले बहुमोल मार्गदर्शन खूप खूप अनमोल ठरले आहे. यात कन्या शाळेतील व केंद्रीय शाळेतील वर्षभराचे केलेले"कसबे तडवळा पॅटर्न"अंतर्गत केलेले नियोजन देखील तेवढेच मोलाचे ठरले आहे.यासाठी कन्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षक व तडवळा पॅटर्नचे जनक जगन्नाथ धायगुडे , शहाजी पुरी,पांडुरंग तनमोर,अंबिका कोळी, क्रांती मते, योगीता अपराध,संगिता पाटील सविता जमदाडे,उषा वरूडकर,ऋषीकेश पवार,संजय देशटवाड, भिमाशंकर फुलारी , रामकृष्ण ढवळे व मुख्याध्यापक रहिमान सय्यद तर केंद्रीय शाळेतील बाळासाहेब जमाले,शर्मिला जमाले मुख्याध्यापक केशव पवार यांचे मार्गदर्शन व उत्कृष्ट नियोजन बहुमोल ठरले.यासाठी जिल्हास्तरावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.मा.शिक्षणाधिकारी रविंद्र खंदारे,गरशिक्षणाधिकारी असरार सय्यद,विस्तार अधिकारी किशोरी जोशी केंद्र प्रमुख जगदीश जाकते,कन्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमोद जमाले ,केंद्रिय प्राथमिक शाळा समिती अध्यक्ष विजय पवार,कन्या शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक केशव पवार व शाळा व्यवस्थाप समितीचे सर्व सदस्य ,ग्रामस्थ व पालकांकडून अभिनंदन करण्यात आले.पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. पुन्हा एकदा कसबे तडवळा पॅटर्न अव्वल ठरला अशी सर्वत्र चर्चा होत आहे.




# फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री गोगावले यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले हे शनिवार दि. 21 मार्च 2026 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

शनिवारी 21 मार्च 2026 रोजी दुपारी 12.45 वाजता टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर येथे आगमन व राखीव. दुपारी 02.00 वाजता केळी उत्पादक शेतकरी वेंडर एक्सपोर्टर यांच्याशी चर्चा. दुपारी 03.00 वाजता सुरली व अकोले खुर्द ता. माढा जि. सोलापूर या गावातील केळी, आंबा, पेरू व डाळींब उत्पादक यांच्या शेतावर शिवार फेरी. सायंकाळी 05.30 वाजता सुरली व अकोले खुर्द ता. माढा जि. सोलापूर येथून पेनुर ता. मोहोळ जि. सोलापूर कडे प्रयाण. सायंकाळी 06.00 वाजता पेनुर ता. मोहोळ जि. सोलापूर येथे आगमन व पेनुर यात्रे निमित्त जंगी कुस्ती कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर सायंकाळी 07.30 वाजता पेनुर ता. मोहोळ जि. सोलापूर येथून सातारा कडे प्रयाण करतील.

# 23 व 25 मार्च रोजी जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय खाद्य तेल अभियान व राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे दिनांक 23 ते 25 मार्च 2026 रोजी हुतात्मा स्मृती मंदीर सोलापूर येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर महोत्सवामध्ये विविध धान्य व खाद्य पदार्थांचे एकूण 50 स्टॉल उभारण्यात येणार आहेत. महोत्सवामध्ये प्रमुख आकर्षण म्हणून सेंद्रीय गुळ, काकवी, इंद्रायणी तांदूळ, मंगळवेढा ज्वारी, सोलापूरी हुरडा व जांभुळ कुल्फी, ज्वारी बिस्किटे, केळी व शेवगा पावडर, मध, वाळवण पदार्थ, ड्रायड भाजीपाला, मल्टीमिलेट आटा, कडक भाकरी असे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालापासून प्रक्रिया केलेले विविध पदार्थ ग्राहकांना थेट विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.

त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाबाबत विविध तज्ञांचे चर्चासत्र/ परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच अन्नप्रक्रिया उद्योगाचे विक्री व्यवस्थापन व विपणन याबाबत तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. महोत्सवामध्ये विक्रेता - खरेदीदार संमेलनाच्या माध्यमातून उत्पादक व खरेदीदार यांना एकाच मंचावर आणून त्यांच्यामध्ये वार्षिक करार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वविध अन्नधान्य उत्पादनांचे शेतकरी ते ग्राहक थेट विक्री होईल असे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी व उद्योजक यांनी धान्य महोत्सवास भेट द्यावी. तसेच चर्चासत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या कृषि विषयक आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# आंतरराज्यीय मोटारसायकल चोरटे अटकेत; ६ दुचाकी जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर गुन्हे शाखेने दुचाकी चोरीच्या घटनांवर मोठी कारवाई करत आंतरराज्यीय दोन चोरट्यांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून तब्बल १ लाख ७५ हजार रुपये किमतीच्या ६ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे प्रमोद अर्जुन जेजर (वय २९, रा. अंतरगा, ता. इंडी, जि. विजयपूर, कर्नाटक) व अमोल भाऊसाहेब चव्हाण (वय २६, रा. जाधव वस्ती, आकेर्री, ता. विजयपूर, कर्नाटक) अशी आहेत. दोघेही शिक्षण व्यवसायाशी संबंधित असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

सोलापूर शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवली होती. तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा शोध घेतला. दि. १९ मार्च रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे सापळा रचून आरोपींना ताब्यात घेण्यात आले.



**तपासादरम्यान आरोपींकडून खालील ६ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत :**

- MH-13-DP-1927 – किंमत ₹15,000
- MH-10-BY-4692 – किंमत ₹10,000
- MH-13-BD-0532 – किंमत ₹15,000
- MH-13-AY-7752 – किंमत ₹35,000
- MH-13-BW-3997 – किंमत ₹50,000
- MH-13-ED-4413 – किंमत ₹50,000

एकूण जप्त मालमत्ता : ₹1,75,000

ही सर्व वाहने सोलापूर शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरी करण्यात आली होती. यामध्ये सदर बझार, फौजदार चावडी व एमआयडीसी पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.

या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये भादंवि कलम ३०३ (२) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. आरोपींनी आणखी गुन्ह्यांची कबुली दिल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर व त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

# निसर्गाच्या लहरीपणाचा आंब्याला फटका

## नुकसान भरपाईसाठी कृषिमंत्री भरणे यांना निवेदन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यात काही दिवसांपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे झालेल्या अवकाळी पाऊस, भीषण गारपीट आणि सतत बदलत्या हवामानाचा मोठा तडाखा आंबा उत्पादक पट्ट्यांना बसला असून, या नैसर्गिक आपत्तीमुळे बागांचे अतोनात नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत शुक्रवार दि 20 रोजी 'महादेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या वतीने महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना सचिन नलावडे आणि शेतकऱ्यांनी नुकसानीचे सविस्तर निवेदन देऊन तातडीने मदतीची मागणी करण्यात आली आहे.

यावर्षी वातावरणातील तीव्र बदलांमुळे राज्यातील अनेक आंबा उत्पादक पट्ट्यांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, अनेक भागात मोहोर उशिरा आला आणि त्यानंतर अचानक वाढलेल्या अति थंडीमुळे तो मोठ्या प्रमाणावर करपून गेला. त्यातच अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे फळधारणा अत्यंत कमी झाली असून हजारो शेतकऱ्यांच्या बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. आंबा हे राज्यातील महत्त्वाचे नगदी पीक असून हजारो कुटुंबांचे अर्थकारण यावर अवलंबून असताना हवामानातील अनिश्चिततेमुळे उत्पादक सध्या पूर्णपणे हतबल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर,शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा या मागणीसाठी दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने नमूद करण्यात आले आहे की, कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागाचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि आंबा बागेचे आर्थिक मूल्य लक्षात घेऊन प्रति हेक्टर किमान १० लाख रुपये नुकसानभरपाई जाहीर करावी. तसेच आंबा पिकासाठी स्वतंत्र आणि प्रभावी 'पीक विमा' योजना लागू करून त्यात मोहोर करपणे, अवेळी पाऊस, अति थंडी आणि गारपिटीसारख्या सर्व नैसर्गिक जोखमींचा समावेश करावा, जेणेकरून शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून तातडीने परतावा मिळणे सुलभ होईल. यासोबतच आंबा उत्पादक शेतकऱ्यांना कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी आंबा पिकाला योग्य 'हमीभाव' देण्याबाबत शासनाने ठोस धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी 'महादेश'तर्फे करण्यात आली आहे.

"यंदा मोहोराची स्थिती चांगली असताना अचानक आलेल्या गारपीट आणि अति थंडीमुळे झाडांवरचा मोहोर पूर्णपणे करपून गेला आहे. वर्षभर औषध फवारणी, खते आणि मजुरीवर केलेला मोठा खर्चही आता निघणे कठीण झाले असून निसर्गाने हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून नेला आहे अशा वेळी केवळ आश्वासन नको तर प्रशासनाने प्रत्यक्ष शेतात येऊन वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत.आंबा उत्पादकांना प्रति हेक्टर किमान १० लाख रुपयांचे विशेष पॅकेज देऊन लवकरात लवकर दिलासा द्यावा तरच शेतकरी पुन्हा उभा राहू शकेल."

**- सुवर्णा पाटील,**
आंबा उत्पादक शेतकरी, निमगाव म.

**नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश**

"महादेश फार्मर प्रोड्युसर कंपनीने आंबा उत्पादकांच्या समस्यांबाबत जे निवेदन दिले आहे, त्यातील मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेतली आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने देण्यात आले आहेत. आंबा बागायतदारांना जास्तीत जास्त मदत कशी मिळेल, यासाठी शासन स्तरावर आमचे प्रयत्न सुरू आहेत."

**- ना दत्तात्रय भरणे,**
कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य

# सार्वजनिक शौचालय प्रकल्पावरून सभागृहात गदारोळ

## प्रस्ताव फेरविचारासाठी परत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ भारत अभियान शहरी 2.0 अंतर्गत सार्वजनिक शौचालय प्रकल्पावरून सोलापूर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सर्वसाधारण सभेत जोरदार गदारोळ झाला. प्रकल्पाच्या खर्चात झालेल्या मोठ्या वाढीवर नगरसेवक प्रविण दगोर्पाटील यांनी तीव्र आक्षेप घेत प्रशासनाला थेट सवाल केला.

शासनाच्या निकषानुसार प्रति सीट ₹1.50 लाख खर्च अपेक्षित असताना ३२६ सीटसाठी सुमारे ₹4.89 कोटी खर्च अपेक्षित होता. मात्र सादर प्रस्तावात तब्बल ₹ 5.55 कोटी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आल्याने सभागृहात प्रश्नचिन्ह निर्माण झाले. ₹ 4.89 कोटींच्या प्रकल्पासाठी खर्च दुप्पट कसा वाढला? असा थेट सवाल दगोर्पाटील यांनी उपस्थित केला.

यावेळी त्यांनी प्रशासनाच्या आर्थिक नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, हा केवळ अंदाजपत्रकाचा मुद्दा नसून जनतेच्या पैशाच्या हिशोबाचा प्रश्न आहे, असे ठामपणे सांगितले.



तसेच २७ ठिकाणी शौचालय उभारणीसाठी कोणता सर्वेक्षण अहवाल, तांत्रिक मोजमाप किंवा गरजांचा अभ्यास करण्यात आला आहे का, याचीही विचारणा केली.

याशिवाय, जुन्या ६१४ सीट शौचालये निष्कासित करून फक्त ३२६ नवीन सीट उभारण्याच्या निर्णयावरही त्यांनी आक्षेप घेतला. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय काळात घाईघाईत प्रस्ताव सादर करून प्रशासकीय ठराव करण्यात आला होता.

सभागृहात गोंधळ सुरू असताना दगोर्पाटील यांनी थेट आयुक्तांच्या डायसकडे जाऊन विषय मांडला. अखेर आयुक्तांनी हा प्रस्ताव सध्याच्या स्वरूपात मंजूर न करता फेरप्रस्ताव सादर करून नव्याने सविस्तर पूर्वगणक करण्यास मान्यता दिली.

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या जनसेवेच्या सूचनेनुसार प्रभागात दैनंदिन कामकाज करत असतानाच शहराच्या हितावर परिणाम करणाऱ्या चुकीच्या निर्णयांविरोधात सभागृहात ठामपणे आवाज उठवला पाहिजे, या भूमिकेतूनच आज नगरसेवक प्रविण दगोर्पाटील यांनी प्रथमच सभागृहात सार्वजनिक स्वच्छालयाच्या संशयास्पद अतिरिक्त निधीवर संबंधी आक्रमक भूमिका घेत, शहरहिताच्या प्रश्नांवर निर्भीडपणे मनपा सभागृहात बोलले.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) अॅडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 206

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 7 | | 1 | | | 6 |
| | | | 6 | 9 | | | 1 | |
| | 9 | 6 | | 8 | | | 5 | 3 |
| 9 | 8 | 4 | | | | | | |
| 2 | | | | | | 6 | 4 | |
| 6 | | 3 | | | 5 | 8 | | |
| | 7 | 8 | | 1 | 4 | 9 | | |
| 4 | 2 | | 3 | 6 | 7 | | | 5 |
| 5 | | 1 | | | 9 | 3 | | 4 |

# पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

## 44 प्रवाशांनी भरलेली बस पलटी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पाटस हद्दीत बारामती फाट्याजवळ शुक्रवारी (दि. २०) पहाटे दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास अक्कलकोटहून पुण्याकडे जाणारी एसटी बस पलटी होऊन अपघात झाला आहे. या भीषण अपघातात बसमधील सुमारे ४४ प्रवासी थोडक्यात बचावले असून तीन ते चार प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. बसचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. या बसमध्ये अंदाजे ४४ प्रवासी प्रवास करत होते. अपघातानंतर काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी मार्गाला जोडणाऱ्या बारामती फाट्याजवळ सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे हा परिसर सध्या अपघातप्रवण ठरत आहे. मागील तीन महिन्यांपासून येथे सातत्याने लहान-मोठे अपघात घडत असून, काही अपघातांमध्ये जीवितहानीही झाली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी मालवाहू कंटेनर भंगार दुकानात घुसल्याने एका मजुराचा जागीच मृत्यू झाला होता, तर दोन जण जखमी झाले होते. त्यानंतर ३ जानेवारी २०२६ रोजी हायवा वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ४ जानेवारी २०२६ रोजी ट्रकने कारला धडक दिल्याने दोन महिला जखमी झाल्या होत्या. तसेच फेब्रुवारी महिन्यात सिमेंट वाहतूक करणारा ट्रक पलटी झाल्याची घटना घडली होती.

### वाहनचालकांचा उडतोय गोंधळ

सध्या उड्डाणपूल बांधकामामुळे महामार्गावरील वाहतूक सेवा रस्त्यावरून वळविण्यात आली आहे. रस्त्यावरील खोदकाम, वाकडे-तिकडे वळण आणि अपुरी सूचना यामुळे वाहनचालकांचा गोंधळ उडत असून, अपघातांची शक्यता वाढली आहे. संबंधित ठेकेदाराने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना न केल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनाने तातडीने माहिती फलक, दिशादर्शक चिन्हे व इतर सुरक्षाविषयक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

### सुरक्षेअभावी अपघातांना आमंत्रण

बारामती फाट्याजवळ सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामात ठेकेदार व राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाचा हलगर्जीपणा समोर येत आहे. वाहनचालक व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. वाहतूक कोंडीही वारंवार होत असून, वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी नेमणे, मजबूत संरक्षक कठडे उभारणे आणि स्पष्ट दिशादर्शक फलक लावणे गरजेचे आहे. अपुऱ्या सुरक्षेमुळे या ठिकाणी जीवघेण्या अपघातांत वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

# मंत्री गोगावले केळी उत्पादकांशी साधणार संवाद



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे रोजगार हमी फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले हे शनिवार, २१ मार्च रोजी टेंभुर्णीत शिवगौरी संकल्प प्लाझा येथे परिसरातील केळी उत्पादक शेतकरी, व्यापारी, एक्सपोर्टर व व्हेंडर यांच्याशी विचार विनिमय करणार असल्याची माहिती शिवसेनेचे माढा लोकसभा मतदार संघाचे संपर्क प्रमुख संजय कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोकाटे पुढे म्हणाले की, केळी व्यापाऱ्यांकडून युद्धाच्या नावाखाली केळीचे दर पाडून शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला माल चढ्या भावात विक्री करत आहेत. केळी, पेरू, द्राक्ष फळ उत्पादक शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारचे शासनाचे संरक्षण नाही. एक्सपोर्ट करणारे व्यापारी दोन-दोन, तीन-तीन महिने केळीचे पैसे देत नाहीत. व्यापाऱ्यांकडून वारंवार दर पाडले जातात. यामुळे जळगावप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातही केळी दराचा बोर्ड तसेच शेतकऱ्यांना असावा.

टेंभुर्णी: ना. भरतशेठ गोगवले यांच्या दौऱ्याविषयी माहिती देताना संजय कोकाटे, पोपट अनपट, संतोष पाटील, वैभव कुटे आदी मान्यवर.

विकलेल्या मालाचे पैसे मिळण्याची हमी असावी, अशा शेतकऱ्यांच्या अनेक अडचणींसाठी शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी ना. भरतशेठ गोगावले हे टेंभुर्णी येथे येत आहेत.

त्यानंतर ना. भरतशेठ गोगावले हे केळी, डाळिंब, द्राक्ष, पेरू व आंबा अशा प्लॉटला भेट देणार आहेत. यामध्ये टेंभुर्णी येथील वैभव कुटे यांच्या केळी बाग, सुर्ली येथील डॉ. मनोज काळे यांच्या पेरूच्या प्लॉटला व भागवत आजिनाथ काळे यांच्या केळी प्लॉटला, अकोले-खुर्द येथील संतोष बलभीम पाटील यांच्या डाळिंब प्लॉटला व ऋषिकेश रामभाऊ पाटील यांच्या आंबा बागेला भेट देणार आहेत.

त्यानंतर ते मोहोळ तालुक्यातील पेनुर येथे जिल्हा परिषद सदस्य चरणराज चवरे यांनी आयोजित केलेल्या ग्रामदैवताच्या यात्रेनिमित्तच्या कुस्ती मैदानास भेट देणार आहेत, असे कोकाटे यांनी सांगितले.

यावेळी पंचायत समिती सदस्य पोपट अनपट, बनाना व्हेंडर असोसिएशनचे अध्यक्ष संतोष पाटील, वैभव कुटे, शफी शेख, सागर तळेकर, पंकज जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रींचा प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी दत्तात्रय...! दिगंबरा दिगंबरा.... श्री गुरु दत्ता....! श्रीपाद वल्लभ दिगंबरा....! श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! श्री अन्नपूर्णा माता की जय..!! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात शुक्रवारी श्रींच्या प्रकट दिनानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व विश्वस्त अर्पिताराजे अमोलराजे भोसले व विश्वस्त अनुयाताई संदीप फुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रींचा प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. न्यासाकडून महाप्रसादाच्या उत्कृष्ठ व्यवस्थेने भक्तातून समाधान व्यक्त करण्यात आले. शेकडो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दरम्यान न्यासाच्या महाप्रसाद गृहात श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिनानिमित्त पाळणा कार्यक्रम शुक्रवारी दुपारी १२ वा. ५ मी. संपन्न झाला. या प्रसंगी न्यासाच्या विश्वस्त अर्पिताराजे अमोलराजे भोसले, विश्वस्त अनुयाताई संदीप फुगे, जयश्रीताई मगर, ज्योतीताई मगर, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, चि. समर्थ संदीप फुगे, सुवर्णा घाडगे, युगंधरा बऱ्हाणपूरे, अनिता गडदे, अस्मिता निकम, भैय्या गडदे यांच्या व स्वामी भक्तांच्या उपस्थितीत पाळणा कार्यक्रम संपन्न झाला. पाळणा गीताबरोबरच मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते विधिवत पूजा, धार्मिक कार्यक्रम भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी भक्तांच्या उपस्थितीत श्रींना नैवेद्य दाखविण्यात आले. महाप्रसादाचा संकल्प अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते सोडण्यात आल्यानंतर महाप्रसादास सुरुवात करण्यात आले. प्रकट दिनानिमित्त सकाळच्या वेळी महाप्रसादालयात सोलापूरच्या भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी प्रकट दिनाच्या वेळी फुलांची व गुलालाची उधळण करण्यात आली. अवधूत चिंतन, श्री गुरुदेव दत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज कि, जय च्या जय घोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. चांदीच्या पाळण्यासह श्रींच्या पूजेच्या ठिकाणास आकर्षक फुलांनी सजविण्यात आले होते.

स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री शमी-विघ्नेह गणेश मंदिर, ब्रह्मांडनायक उभी स्वामींची मूर्ती, नियोजित महाप्रसादगृह इमारत, सध्याचे अद्यावत तात्पुरते महाप्रसादालय, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, कार्यरत यात्री निवास-१, यात्रीभुवन-२, अतिथी गृह, आऊटडोअर व इनडोअर जीम, प्रशस्त वाहनतळ, टेकडीवरील श्री समर्थ वाटिका, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशमन, रुग्णवाहिका, आश्रयदाते कक्ष, नवीन सुरु असलेले महाप्रसादालयाचे बांधकामसह हाती घेतलेल्या विविध उपक्रम व व्यवस्थेचे स्वागत करुन न्यासाचे कौतुक केले.

यावेळी राज्याचे गृह राज्य मंत्री ना. योगेश कदम यांचे स्वीय सहायक- प्रदीप गुरव, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक प्रकाश बावीसकर, सानपाडा, नवी मुंबई, मुंबई लोहमार्ग पोलीस चे विशेष शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश देवरे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संदीप फुगे, राहुल मगर, सौरभ मोरे, मनोज निकम, रामचंद्रराव घाटगे, अशोकराव पवार, प्रवीण देशमुख, सिद्धेश्वर मोरे, वैभव मोरे, सनी सोनटक्के, रोहित खोबरे, शिवराज स्वामी, निखील पाटील, अतिश पवार, गोटू माने, योगेश कटारे, विराज माणिकशेट्टी, प्रवीण घाटगे, रोहन शिर्के, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी, मल्लिनाथ कोगनुरे, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण, किरण साठे, विनायक भोसले, शुभम सावंत, सागर जाधव, वैभव कामनुरकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### उत्कृष्ठ व्यवस्थापन :

श्रींच्या प्रकट दिनाच्या दिवशी श्रीक्षेत्र अक्कलकोटला आलो असता, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात शेकडो स्वामी भक्त महाप्रसादाकरिता आलेले होते. त्याठिकाणी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ठ नियोजन व व्यवस्थापन पाहून आम्ही सकल स्वामी भक्त समाधानी आहोत.

**-मोहन जोशी,** जेष्ठ अभिनेते, मुंबई

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी चिमणीचे संवर्धन करणे गरजेचे आहे - प्रा. धनंजय देशमुख



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मानवाच्या सभोवतालच्या निसर्गात अनेक प्रकारचे पक्षी आढळतात परंतु निसर्गाच्या अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा घटक म्हणजे चिमणी आहे परंतु चिमण्यांची संख्या कमी होण्यामागे शहरीकरण, अन्नसाखळीतील बदल,किटकांची कमतरता आणि घरट्यांसाठी जागेचा अभाव ही कारणे अधिक महत्त्वाची आहेत म्हणून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी चिमणीचे संवर्धन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन पक्षीमित्र प्रा.धनंजय देशमुख यांनी केले.

यशवंतनगर येथील महर्षि शंकरराव मोहिते प्रशालेमध्ये जागतिक चिमणी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.प्रा.देशमुख म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी चिमण्या महत्त्वाची भूमिका बजावतात.त्या लहान कीटकांवर उपजीविका करतात आणि त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने कीटक नियंत्रणात मदत करतात. शेती क्षेत्रात अनेक प्रकारचे कीटक पिकांचे नुकसान करतात.चिमण्या आणि इतर पक्षी हे कीटक खाऊन त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवतात. त्यामुळे शेतीचे अप्रत्यक्ष संरक्षण होते.काही वेळा चिमण्या बिया आणि धान्य खाल्ल्यानंतर त्या इतर ठिकाणी पसरवतात.चिमण्यांची संख्या कमी होण्यामागे अनेक कारणे सांगितली जातात.त्यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे अन्न साखळीतील बदल शेतीमध्ये आणि बागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांमुळे कीटकांची संख्या कमी होत गेल्यामुळे पिलांना पुरेसे अन्न मिळणे कठीण झाले आहे.त्याचा अप्रत्यक्ष परिणाम चिमण्यांवर झाला आहे. चिमण्यांच्या घटत्या संख्येबाबत सर्वाधिक चर्चेत आलेले कारण म्हणजे मोबाईल टॉवर्स.मोबाईल फोनच्या वापरात वाढ झाल्यानंतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात मोबाईल टॉवर्स उभारले गेले.या टॉवर्समधून निघणाऱ्या विद्युत चुंबकीय किरणोत्सर्जनामुळे चिमण्यांच्या अंड्यांवर परिणाम होतो म्हणजेच मानवासाठी उपयुक्त असलेल्या टॉवरच्या रेडिओ फ्रिक्वेन्सीच्या बळी चिमण्या ठरत आहेत.पूर्वीच्या घरांची रचना चिमण्यांसाठी अनुकूल होती. मातीच्या भिंती, कौलारू छप्पर, लाकडी बीम, छपराच्या कडांमधील फटी,वाड्यांच्या अंगणातील झाडे या सर्व गोष्टी चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा देत असत.घराच्या ओसरीत ठेवलेले धान्य, गिरण्या, बाजारपेठा, धान्याची दुकाने यामुळे चिमण्यांना अन्नाची कमतरता भासत नसे.त्यामुळे गावामध्ये चिमण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.परंतु शहरीकरणामुळे या परिस्थितीत मोठा बदल झाला. काँक्रीटच्या उंच इमारती, काचांच्या बंद खिडक्या, पूर्णपणे सीलबंद बांधकाम आणि स्वच्छतेच्या बदललेल्या पद्धती यामुळे चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी आवश्यक जागाच उरलेली नाही. यावेळी विद्यार्थ्यांना प्लास्टिक प्लेट, बॉटल, लाकडी बॉक्स, पाईप यापासून निवारा, अन्नधान्य तसेच पाण्याची साधने कशाप्रकारे बनवायचे याचे प्रात्यक्षिक प्रा.देशमुख यांनी करून दाखविले.

यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य अनिल जाधव,पर्यवेक्षक उमेश बोरावके, ज्येष्ठ शिक्षक राजाराम काळे, शिक्षिका भाग्यश्री उरवणे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक गळीतकर सर यांनी केले. सूत्रसंचालन नागेश सोनवणे यांनी तर आभार बिभीषण जाधव यांनी मानले.

# उपचारांना नवीन तंत्रज्ञानाची जोड द्यावी : मोहिते-पाटील



**अकलुज (कटूसत्य वृत्त):-** दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या पाहता डॉक्टरांचीही गरज वाढत आहे. डॉक्टरांनी ही नवनवीन उपचार पध्दती, तंत्रज्ञान आणि औषधांचा माहिती घेणे गरजेचे असुन उपचाराला नवीन तंत्रज्ञानाची जोड देवुन रुग्णांना व्याधी मुक्त करावे असे आवाहन अकलुज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील यांनी डॉक्टरांना केले.

गुड्डी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर शंकरनगर येथे डॉ.श्रीकांत सुनिल बांगर यांच्या अकलाई क्लिनिकचे उद्घाटन मदनसिंह मोहिते पाटील यांचे शुभहस्ते तर इंडियन मेडिकल असोसिएशनचे तालुका अध्यक्ष डॉ.संजय सिद, शंकरनगर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल आव्हाड, डॉ.सौरभ गायकवाड,दंत शल्य चिकित्सक डॉ .सावन पालवे यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडले.त्यावेळी मोहिते पाटील यांनी उत्तम आरोग्याच्या माध्यमातून दिघार्युष्याचा कानमंत्र दिला.

मदनसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले की, पालकांनी मुलांना उदिष्ट दाखवावे.शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंब देशाची प्रगती साध्य होत असते, प्रगतीचे दार खुले होते.यामुळे मुलांमध्ये क्षमता निर्माण करुन त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे.


अकलूज विषयी बोलताना मोहिते पाटील म्हणाले की, मेडिकल हब म्हणून अकलूज उदयास आले आहे.येथे मिळणाऱ्या सुविधा,मुलभुत गरजांची होणारी पुर्तता यामुळे शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात अकलूज ने प्रगती केली आहे.तसेच वेळीत घेतलेले उपचारच दिघार्युष्याची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉक्टर संजय सिद, डॉक्टर अमोल आव्हाड यांनीही आरोग्य व उपचारांचे महत्त्व सांगुन डॉ. श्रीकांत बांगर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ पत्रकार चंद्रकांत कुंभार,भारत मगर,पत्रकार कृष्णा लांवंड, पत्रकार नागेश लोंढे, ग्रामपंचायत सदस्य सचिन डांगे यांचेसह आरोग्य क्षेत्रातील मान्यवर व परीसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार नागेश लोंढे आणि प्रा. सचिन सोनवने यांनी यांनी केले तर आभार डॉ.सावन पालवे यांनी मानले.

# सरसकट पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी - चेतनसिंह केदार सावंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना अवकाळी पावसाने झोडपल्याने सांगोला तालुक्यातील डाळिंब, द्राक्ष, केळी, आंबा, पेरू यासह इतर फळबागांचे आणि ज्वारी, मका, गहू तसेच पालेभाज्या या शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके व फळबागा हातातून जाण्याची चिन्हे दिसू लागल्याने शेतकरी आता मोठ्या संकटात सापडला आहे. नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य चेतनसिंह केदार सावंत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तहसीलदार बाळूताई भागवत यांच्याकडे केली आहे.

सांगोला शहर आणि तालुक्यात दोन दिवस अवकाळी पावसाने तसेच गारपीटीने झोडपल्याने डाळिंब, केळी, द्राक्ष, आंबा, पेरू, सीताफळ, चिकू यासह इतर फळबागा आणि रब्बी हंगामातील ज्वारी, मका, गहू यासह तरकारी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस आणि वादळी वारे यामुळे शेतातील उभी पिके कोलमडून पडली तर द्राक्ष पिकांना घडकुज कुजवा रोगांचा प्रादुर्भाव वाढला. मोहोर अवस्थेत असलेल्या आंब्याच्या बागांनाही ढगाळ वातावरण अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा फटका बसला आहे. मोहोर गळून गेल्याने आंबा उत्पादक शेतकरी प्रचंड संकटात सापडला आहे. दुष्काळी परिस्थितीशी झगडत जतन केलेल्या फळबागा अवकाळी पावसाने उद्‌‌वस्त झाल्याने शेतकऱ्यासमोर आर्थिक संकट उभा राहिले आहे. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून सरसकट पंचमाने करून भरपाई द्यावी अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य चेतनसिंह केदार सावंत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तहसीलदार बाळूताई भागवत यांच्याकडे केली आहे.

सांगोला तालुक्यात वादळी वारे आणि अवकाळी पावसाळे शेती पिकांचे आणि फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. अनेक शेतकरी आपली पिके जगवण्यासाठी संघर्ष करत होते. वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी, नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी महसूल विभागाने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून असा अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करून नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य चेतनसिंह केदार सावंत यांनी केली आहे.

# श्री भैरवनाथ मंदिर वाशिंबे येथे उत्साहात कार्यक्रम



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या शुभ मुहूर्तावर श्री क्षेत्र वाशिंबे येथील श्री भैरवनाथ मंदिर परिसरात भगवा ध्वज उभारणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले.

सकाळी ९ वाजता भगवा ध्वज उभारणी सोहळा पार पडला. ग्रामस्थ मंदिर परिसरात भक्तांनी एकत्र येऊन तो उभारला. हा सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सर्व उपस्थितांनी नववर्षाच्या मंगल शुभेच्छा दिल्या. भगवा ध्वज उभारणीमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

त्याचबरोबर रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ५७ रक्तदात्यांनी शिबिरात स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून जीवनदानाचा भाग बनले. रक्तदानामुळे अनेक रुग्णांच्या जीवाला मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. शिबिर यशस्वी करण्यासाठी जे.के.फाऊंडेशन आणि युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

मान्यवरांच्या यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी उपस्थितांनी भैरवनाथ महाराजांच्या दर्शनासह नववर्षाच्या शुभेच्छा आदान-प्रदान केल्या. वाशिंबे हे गाव भैरवनाथ महाराजांचे ग्रामदैवत म्हणून ओळखले जाते. हे प्राचीन मंदिर भिमा नदीकाठावर वसलेले असून, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणूनही प्रसिद्ध आहे.

या कार्यक्रमामुळे गावात सकारात्मक आणि सामाजिक जाणिवेचे वातावरण निर्माण होते. सर्व भाविकांनी आगामी काळात अशा उपक्रमांना अधिक मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले.

## पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करू शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौंड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.